'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० | मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई
Email ID : shabdarutu@gmail.com

※ वर्ष २ रे ※ अंक ४७ वा ※ रविवार दि. २४ ऑगस्ट २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ※ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

### जनता दरबारात मुख्यमंत्र्यांच्या लगावली कानशिलात!

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांचा जनता दरबार सुरू असताना एका व्यक्तीने त्यांच्या कानशिलात लगावल्याची धक्कादायक घटना घडली. रेखा गुप्ता त्यांच्या कॅम्प ऑफिसमध्ये जनसुनावणी घेत होत्या, तेव्हा त्यांच्यावर हा हल्ला झाला. यानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. पोलिसांनी हल्लेखोराला अटक केली आहे. दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी साप्ताहिक जनसुनावणीदरम्यान मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावरील या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे.

# १२, २८ टक्क्यांचा जीएसटी स्लॅब रद्द!




**नवी दिल्ली :** केंद्र सरकारकडून सर्वसामान्यांना महागाईपासून दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. केंद्र सरकारनं जीएसटीचे स्लॅब घटवून दोन केले आहेत. आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के जीएसटी असेल. तर, १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब पूर्णपणे बंद केला जाईल. २१ ऑगस्ट २०२५ ला झालेल्या बैठकीत मंत्रिगटाने केंद्र सरकारचा प्रस्ताव स्वीकारला आहे.

सध्या जीएसटीचे चार स्लॅब आहेत. ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के या चार पैकी दोन स्लॅब बंद केले जाणार आहेत. त्यामध्ये १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब पूर्णपणे संपवण्यात येईल. यामुळं सर्वसामान्य लोकांना दिलासा मिळेल, असं सांगितलं जात आहे.

१२ टक्के स्लॅबमध्ये असलेल्या वस्तू आणि सेवा ५ टक्क्यांमध्ये येईल. तर, २८ टक्के स्लॅबमधील जवळपास ९० टक्के वस्तू १८ टक्क्यांमध्ये येतील. तंबाखू आणि पान मसाला याच्यावर अधिक जीएसटी अधिक असेल.

आणखी एक दिलासादायक माहिती म्हणजे आरोग्य आणि जीवन वि यावरील जीएसटी माफ करण्याच्या प्रस्तावावर मंत्रिगटाच्या बैठकीत चर्चा झाली. यामध्ये वैयक्तिक आरोग्य विमा (पान २ वर)

### १२ वरून ५ टक्के स्लॅबमध्ये येणाऱ्या वस्तू

१२ टक्के स्लॅब बंद करुन त्यातील वस्तू आणि सेवा ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये आणल्यानं कर ७ टक्क्यांनी कमी होईल. यामुळं कपडे आणि रेडिमेड कपडे, चप्पल, बूट, प्रिंटिंग आणि स्टेशनरी वस्तू, प्रक्रिया केलेले अन्न पदार्थ, होम अप्लायन्सेस वरील कर कमी होईल. या बदलाचा थेट परिणाम मध्यम वर्गावर आणि सर्वसामान्य ग्राहकावर होईल.

### २८ वरून १८ टक्के स्लॅबमध्ये येणाऱ्या वस्तू

२८ टक्के स्लॅबमधील जवळपास ९० टक्के वस्तू १८ टक्के स्लॅबमध्ये आणल्यानं दुचाकी वाहनं, चार चाकी कार, सीमेंट आणि बिल्डींग मटेरियल, फ्रीज, त्या वस्तूंच्या किंमतीवर लागणारा कर १० टक्क्यांनी कमी होईल. यामुळं वॉशिंग मशीन, एअर कंडीशनर, टीव्ही याचा समावेश होतो. पॅकेजमधील अन्नपदार्थ, बेवरेजेस, पेंटस आणि वॉर्निश यावरील कर कमी होतील. यामुळं ग्राहकांसह रिअल इस्टेट आणि ऑटोमोबाइल सेक्टरमध्ये विक्रीत तेजी येऊ शकते.


# ऑनलाईन गेमिंग विधेयक राज्यसभेतही मंजूर




**मुंबई :** ऑनलाइन गेमिंग विधेयक आज संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा शेवटच्या दिवशी राज्यसभेतही मांडण्यात आले. राज्यसभेत ऑनलाइन गेमिंग विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे कामकाज १० मिनिटांसाठी थांबवण्यात आले.

या विधेयकाचा उद्देश ई-स्पोर्ट्स आणि ऑनलाइन सोशल गेमिंगला प्रोत्साहन देताना सर्व प्रकारच्या ऑनलाइन मनी गेमवर बंदी घालणे आहे. महिनाभर चाललेल्या अधिवेशनात लोकसभेने १२ आणि राज्यसभेने १५ विधेयके मंजूर केली. अधिवेशनाच्या शेवटपर्यंत वारंवार व्यत्यय, तहकूब आणि बहिष्कार सत्र सुरूच राहिले.

### नवी कोरी पुस्तकं




**कथासरिता**
: लेखकाचे नाव :
**संपा. डॉ. गोविंद काजरेकर**
किंमत रु. : ३२०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**मन थेंबांचे आकाश**
: लेखकाचे नाव :
**अशोक लिंबेकर**
किंमत रु. : ३२५/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

### संक्षिप्त

## ५ दिवस आधीच मिळणार पगार!

**मुंबई ।** राज्यातील शासकिय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्ती वेतनधारक यांच्यासाठी शासनाने खुशखबर दिली आहे. गणेशोत्सव सणाचा उत्साह आणि गणेशोत्सवाची धूम लक्षात घेता ऑगस्ट महिन्याचा पगार ५ दिवस आधीच बँक खात्यात जमा केला जाणार आहे. ऑगस्ट महिन्याचे वेतन २६ ऑगस्ट रोजीच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे, साहजिकच सरकारी नोकरदारांचा गणेशोत्सावाचा आनंद द्विगुणीत झाला आहे. दरम्यान, गणेशोत्सव काळात गणेश मंडळांना रात्री बारा वाजेपर्यंत देखावे दाखवण्यासाठी शेवटचे पाच दिवस दिले जाणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

# बेस्टच्या टेस्टमध्ये शिवसेना-मनसे फेल

## भ्रमाचा भोपळा फुटला : अनेक वर्षांची सत्ता गमावली

**मुंबई :** बेस्ट कर्मचारी सहकारी पतपेढीच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या मनसेच्या संयुक्त पॅनलला सपशेल अपयश आले. अनेक वर्षांपासून ची या संस्थेतील सत्ता शिवसेनेला गमवावी लागली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेल्या शिवसेना (उबाठा) - मनसे युतीला या पहिल्याच लिटमस टेस्टमध्ये अपयश आले. आता पुढे ही युती टिकणार का ? असा प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे. दुसरीकडे, १४ जागा जिंकलेल्या शशांकराव यांच्या पॅनलने महायुतीच्या ७ जागा जिंकलेल्या पॅनल सोबत काम करण्यास उत्सुकता दर्शवली आहे. तर भाजपाच्या वतीने आशिष शेलार यांनी शशांक राव यांची मुंबई महापालिका निवडणुकीसाठी (पान २ वर)

> “ शिवसेना (उबाठा) आणि एमएनएसच्या युतीने ही निवडणूक गमावल्याने आम्हाला धक्का बसला आहे. मात्र, हा निकाल आमच्या राजकीय रणनीतीवर परिणाम करणारा नाही. आम्ही आगामी महापालिका निवडणुकांसाठी तयारी करत आहोत आणि जनतेच्या पाठिंब्यावर विश्वास ठेवतो. ही निवडणूक आमच्या कार्यकर्त्यांसाठी एक शिकवण आहे आणि आम्ही यातून बोध घेऊन पुढे जाऊ.
> **- राज ठाकरे**

# ओबीसीमध्ये आणखी २१ जातींचा होणार समावेश!

**पुणे :** राज्याच्या इतर मागासवर्ग (ओबीसी) जातींच्या महाराष्ट्राच्या यादीत आता नव्या २९ जातींचा समावेश करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य सरकारला शिफारशींचा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला आहे. राज्य सरकारची मोहोर उमटल्यानंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे.

राज्यात ओबीसी जातींची यादी खूप मोठी आहे. सुमारे ३५१ प्रकारच्या मूळ जाती असून, त्यामध्ये उपजाती अनेक आहेत. त्याशिवाय विमुक्त जाती, भटक्या जाती, जमाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग अशा विविध जातींचा समूह राज्यात आहे. त्यामध्ये असंख्य उपजातींचा समावेश असून, त्यांचा राज्याच्या यादीत समावेश (पान २ वर)




राज्य मागासवर्ग आयोगाची शिफारस

### ओबीसी समावेशासाठी प्रस्तावित जाती

राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य सरकारला २९ जातींचा ओबीसी वर्गाच्या जातींच्या यादीत समावेश करण्यासाठी शिफारस केली आहे. त्यामध्ये लोध, लोधा, लोधी, बडगुजर, पेंढारी, वीरशैव लिंगायत, लिंगायत गुरव; तसेच लिंगायतमधील जंगम, न्हावी, तेली, माळी, धोबी, फुलारी, सुतारी आदी उपजातींच्या समावेशाची शिफारस केली आहे. पोवार, भोयर, पवार, गुजर, रेवा गुजर, सूर्यवंशी गुजर, बेलदार, सलमानी, किराड, डांगरी, कलवार, कुलवंत वाणी, वाणी (कुलवंत), कुमावत, नेवेवाणी, वरठी, परीट, धोबी, पटवा, सपलिग, सपलिगा, निषाद, मल्लाह, कुंजडा, दोरी, ईस्ट इंडियन, ईस्ट इंडियन ख्रिश्चन, शेगर, कानोडी, गवलान या जातींचा समावेश करण्याची शिफारस मागासवर्ग आयोगाकडून करण्यात आली आहे.

## मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर

# राज्य सरकारने मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना

**मुंबई :** मराठा समाजासाठी आताची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने मराठा समाजासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर राज्य सरकारने मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना केली आहे. या राज्य मंत्रिमंडळ उपसमितीचे नवे अध्यक्ष राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील असणार आहेत. मागील शिंदे सरकारच्या काळात, ४ ऑक्टोबर २०२२ रोजी स्थापन झालेल्या राज्य मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तत्कालीन उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील होते. पाटील यांच्या जागी आता विखे-पाटील यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे.

मराठा समाजाची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि इतर विषयांवर शिफारसी करण्यासाठी सरकारने कॅबिनेट उपसमितीची पुनर्रचना केली आहे. या कॅबिनेट उपसमितीत एकूण १२ कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. शुक्रवारी राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भात एक सरकारी आदेश जारी केला आहे. मराठा आरक्षणासाठी प्रशासकीय आणि कायदेविषयक कामांचे समन्वय साधण्याची जबाबदारी कॅबिनेट उपसमितीला देण्यात आली आहे. यासोबतच, कॅबिनेट उपसमिती मराठा आंदोलक आणि त्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करेल. न्यायालयाने (पान २ वर)




राधाकृष्ण विखे - पाटील अध्यक्ष

## सर्जियो गोर हे अमेरिकेचे राजदूत

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जवळचे सहकारी आणि व्हाईट हाऊसच्या प्रेसिडेंशियल पर्सनल ऑफिसचे संचालक सर्जियो गोर यांचे नाव आता भारताशी जोडले जाणार आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गोर यांची भारतातील नवीन अमेरिकेचे राजदूत म्हणून नियुक्ती केली आहे. यासोबतच, गोर यांना दक्षिण आणि मध्य आशियाई बाबींसाठी विशेष दूताची जबाबदारीही देण्यात आली आहे.

# ही बोगस जनता पार्टी आहे : उद्धव ठाकरे



**मुंबई :** ही बोगस जनता पार्टी आहे, मत चोरी होणार नाही याची दक्षता घ्या, हे सगळं चालले आहे, प्रामाणिक निवडणूक घेतली तर हे महाराष्ट्र जिंकूच शकत नाही, जे जिंकले आहेत त्यांचे राहुल गांधी यांनी यांचे ढोंग उघडे पाडले असल्याचा घणाघात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. राज्य शिक्षक सेनेच्या कार्यक्रमात बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपवर हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, कबुतरांसाठी लोक रस्त्यावर उतरतात, कुत्रे आणि हत्तीसाठी उतरतात ही (पान २ वर)

# ...तर पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याला पदावरून हटवले जाणार

## पंतप्रधान मुख्यमंत्री, मंत्र्यांसाठी संसदेत विधेयक । विरोधकांकडून विरोध

**नवी दिल्ली :** गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक झाल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याला पदावरून काढून टाकण्यासाठी केंद्र सरकार कायदा करणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी (२० ऑगस्ट) संसदेत यासाठी तीन विधेयके सादर केली. या विधेयकांमध्ये अशी तरतूद आहे की जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याला अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये अटक झाली, ज्यामुळे किमान पाच वर्षांचा तुरुंगवास होऊ शकतो आणि त्यांना सलग ३० दिवस कोठडीत ठेवले गेले, तर ३१ व्या दिवशी त्यांना पदावरून काढून टाकले जाईल.




तिन्ही विधेयकांविरुद्ध लोकसभेत प्रचंड गोंधळ झाला. खासदारांनी तिन्ही विधेयकांच्या प्रती फाडत थेट अमित शाहांच्या अंगावर फेकल्या. त्यामुळे आणखी गदारोळ वाढला. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी ससदेचं काम स्थगित केलं. विरोधकांनी तिन्ही विधेयकं मागे घेण्याची मागणी केली. काँग्रेस आणि एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनीही विरोध केला. समाजवादी पक्षाने विधेयकांना न्यायविरोधी, संविधानविरोधी म्हटले. यावर शहा यांनी ही विधेयके संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याची मागणी केली. केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक २०२५, १३० वी ३० दिवस तुरुंगात, ३१ व्या दिवशी पदमुक्ती ! घटनादुरुस्ती विधेयक २०२५ आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयक (पान २ वर)

### केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक २०२५

केंद्र सरकारच्या मते, सध्या केंद्रशासित प्रदेशांमध्ये केंद्रशासित प्रदेश कायदा, १९६३ अंतर्गत गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्याची तरतूद नाही. म्हणून, अशा प्रकरणांमध्ये मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करण्यासाठी केंद्रशासित प्रदेश कायदा, १९६३ च्या कलम ४५ मध्ये सुधारणा

### जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन (सुधारणा) विधेयक २०२५

जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन कायदा, २०१९अंतर्गत, गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्याची कोणतीही तरतूद नाही. जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन कायदा, २०१९ च्या कलम ५४ मध्ये सुधारणा केल्यानंतर, गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना ३० दिवसांच्या आत काढून टाकण्याची तरतद असेल.

### १३० वे संविधान दुरुस्ती विधेयक २०२५

केंद्राने या विधेयकाबद्दल म्हटले आहे की गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मंत्र्याला काढून टाकण्याची संविधानात कोणतीही तरतूद नाही. म्हणून, अशा प्रकरणांमध्ये, पंतप्रधान किंवा केंद्रीय मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्यांना आणि राज्यांच्या किंवा राष्ट्रीय राजधानी प्रदेशाच्या मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्यांना किंवा मुख्यमंत्री किंवा कोणत्याही मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करण्यासाठी संविधानाच्या कलम ७५, १६४ आणि २३९ए ए मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

# गणेशोत्सव काळात नियमांचे काटेकोर पालन करा

## डीजे वरील बंदी कायम : पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

**श्रीरामपूर :** आगामी गणेशोत्सव पर्यावरण पुरक साजरा करावा, या काळात नेहमी प्रमाणे डीजेवर बंदी असून प्रत्येक मंडळांनी ठरवून दिलेल्या नियामांचे काटेकोरपणे पालन करुन गणेशोत्सव शांततेत पार पाडावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

श्रीरामपूर पोलीस ठाणे व श्रीरामपूर नगरपालिका यांच्यावतीने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेश मंडळ अध्यक्ष व पदाधिकारी, शांतता कमिटी सदस्य, महिला दक्षता समिती सदस्य, गणेशमुर्ती विक्रेते आदींच्या उपस्थितीमध्ये शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थित पदाधिकार्यांना व मंडळातील सदस्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

याप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी



जयदत्त भवार, तहसीलदार मिलिंद कुमार वाघ, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक अरुण धनवडे, पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके, मानाचा गणपती मंडळाचे अध्यक्ष मनोज नवले, रिपाइंच्या महिला आघाडीच्या रमादेवी धीवर आदींसह शहरातील प्रमुख मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत आगामी गणेश उत्सवाच्या अनुषंगाने सर्व गणेश मंडळांना ऑनलाईन परवानगी घेण्याबाबत तसेच डॉल्बी, डी.जे. न वाजवता पारंपारीक वाद्य वाजवून, प्रदुषण मुक्त व पर्यावरण पुरक वातावरणामध्ये गणेश उत्सव साजरा करावा, सामजिक तेढ निर्माण करणारे देखावे करु नये, गणेश मुर्तीचे पावित्य राखण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करुन गणेश उत्सव मंडळामध्ये आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे, वाहतूकीस अडथळा निर्माण होणार नाही, अशा रितीने मंडपाची उभारणी करावी, अशा मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या.

यावेळी श्रीरामपूर शहरातील तसेच शहर पोलीस ठाणे हद्दीतील विविध मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नाफेडची कांदा खरेदी थांबली!

**अहिल्यानगर :** केंद्र सरकारच्या भाव स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने राज्यातील २५ केंद्रांवर एक लाख ४३ हजार किंटल कांद्याची खरेदी पूर्ण केली आहे. उद्दिष्टपूर्ती झाल्याचे सांगत आता यापुढे कांदा खरेदी करण्यात येणार नसल्याचे नाफेडने स्पष्ट केले आहे.

भारतीय राष्ट्रीय सहकारी पणन महासंघ (नाफेड) व राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) या दोन्ही संस्था यंदा तीन लाख टन कांद्याची खरेदी करणार आहेत. नाफेड मार्फत दीड लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. नाफेडने राज्यातील २५ खरेदी केंद्र निश्चित केली आहेत. आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी पुढील सात दिवसांचा दर निश्चित होतो. सुरवातीला १,३५० रुपयांप्रमाणे त्यानंतर अकराशे रुपये आणि शेवटी ९५० रुपये प्रतिक्विंटल या दराने नाफेडने खरेदी केली आहे. अहिल्यानगर व पुणे येथील खरेदी केंद्र वगळता उर्वरित बहुतांश केंद्रे नाशिक जिल्ह्यात आहेत.

# लोकांनी निवडलेलं सरकार चालवायला राज्यपालांच्या मर्जीची काय गरज?

**नवी दिल्ली :** राज्य विधिमंडळाने पाठवलेल्या विधयकांना मान्यता देण्यासाठी राज्यपालांनी किती वेळ घ्यावा? याबद्दल केल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयासमोर झालेल्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी सरकारला महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. संविधानाने अनुच्छेद २०० अंतर्गत राज्यपालांना विधेयक रोखून धरण्याचा अधिकार दिला आहे असा युक्तिवाद सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांनी केला. त्यावर, विधानसभांनी मंजूर केलेली विधेयके राज्यपालांनी कायमस्वरूपी रोखून धरल्यास, लोकनियुक्त राज्य सरकारांना राज्यपालांच्या लहरी आणि मर्जीवर अवलंबून राहावे लागेल असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

पण त्यानंतर आपण याचिकांना रोखून धरण्याचे संपूर्ण अधिकार राज्यपालांना देतोय असे होणार नाही का?. बहुमताने निवडून आलेल्या सरकारला राज्यपालांच्या लहरी आणि मर्जीवर अवलंबून राहावे लागेल, असा प्रश्न सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केला. खंडपीठाने म्हटले की, राज्यपालांनी विधेयक रोखून धरल्यानंतर ते विधेयक रद्द होते असा अर्थ लावला, तर याचा राज्यपालांचे अधिकार आणि कायदे बनवण्याच्या प्रक्रियेवर विपरित परिणाम होईल. राज्य सरकारने मंजूरसाठी पाठवलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने निश्चित कालमर्यादा घालून दिली होती, यावर राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी केलेल्या याचिकेवर पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी सुरू होती. संसद आणि विधिमंडळांनी संमत दिलेल्या विधेयकाला मंजुरी देण्यासाठी, सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपती आणि राज्यपालांना कालमर्यादा आखून देऊ शकते का, असा प्रश्न राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विचारला होता. संविधानानुसार राज्यपालांना अनुच्छेद २०० अंतर्गत असलेल्या अधिकारांचा दाखला देत मेहता खंडपीठासमोर म्हणाले की, हा काही निवृत्त राजकारण्यासांठी राजकीय आश्रय नाही, त्याला ठराविक महत्व आहे, जे संविधान सभेत चर्चिले गेले होते. राज्यपाल जरी निवडून आलेले नसले तरी ते राष्ट्रपतींचे प्रतिनिधी आहेत. आणि यांत्रिकपणे विधेयकांना मंजुरी देणारे फक्त एक पोस्टमन नाहीत. एखादा असा व्यक्ती जो थेट निवडून आलेला नाही तो दुय्यम व्यक्ती ठरत नाही, असे मेहता म्हणाले. न्यायमूर्ती सूर्यकांत, विक्रम नाथ, पीएस नरसिंह आणि एएस चांदुरकर यांच्या खंडपीठापुढे बोलताना मेहता म्हणाले की, राज्य विधिमंडळाने पाठवलेल्या विधेयकाला मान्यता देण्याचा, मान्यता रोखण्याचा, कोणत्याही केंद्रीय कायद्याशी परस्परविरोधा आढळून आल्यास राष्ट्रपतींकडे पाठवण्याचा किंवा पुनर्विचारासाठी राज्य विधिमंडळाकडे परत पाठवण्याचा पर्याय राज्यपालांना आहे.

# ५००० किलोमीटर रेंज असलेल्या अग्नि ५ चे यशस्वी परीक्षण


**मुंबई :** ओडिसाच्या चांदीपूर येथील इंटीग्रेटेड टेस्ट रेंज येथून मध्ये अंतराची बॅलेस्टिक मिसाईल अग्नि-५ चं यशस्वी परीक्षण करण्यात आलं. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार या परीक्षणात सर्व संचालन आणि तंत्रज्ञानाच्या मानकांची पुष्टी झाली. ही चाचणी स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या देखरेखीत करण्यात आली.

अग्नि -५ हे जमिनीवरुन जमिनीवर मारा करणार एकमेव आंतरखंडीय बॅलेस्टिक मिसाइल आहे. अग्नि -५ मारक क्षमता ५००० किलोमीटर पेक्षा अधिक आहे. या रेंजमध्ये संपूर्ण चीन येतो. याशिवय यूरोप आणि आफ्रिकेचा काही भाग देखील येतो. या मिसाईलमध्ये मल्टीपल इंडिपेंडेंटी टार्गेटेबल री-एंट्री वेईकल्स तंत्रज्ञानाचा समावेश आहे. म्हणजे हे क्षेपणास्त्र एकदा लॉंच केल्यानंतर अनेक टार्गेटवर हल्ला करु शकतं. अग्नि-५ मध्ये दीड टनापर्यंत अणवस्त्र वाहून नेण्याची क्षमता आहे.

अग्नि-५ चा वेग मॅक २४ आहे, म्हणजेच आवाजाच्या वेगाच्या २४ पट अधिक आहे. या क्षेपणास्त्राची लॉंचिंग यंत्रणा कॅनिस्टर तंत्रज्ञानावर आधारित आहे. या कारणामुळं याची वाहतूक करणं देखील सोपं आहे. सध्या भारताशिवाय केवळ आठ देशांकडे इंटर कॉन्टिनेंटल बॅलेस्टिक मिसाईल आहे. रशिया, अमेरिका, चीन, फ्रान्स, इस्त्रायल, ब्रिटन आणि कोरियाचा समावेश आहे.

# भारत अमेरिकेच्या मैत्रीवर अवलंबून राहू शकत नाही

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांवर लादलेल्या टॅरिफमुळे



जागतिक व्यापारावर परिणाम होत आहे आणि भारतालाही याचा फटका बसायला सुरुवात झाली आहे परंतु अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचे माजी सल्लागार आणि ज्येष्ठ अर्थशास्त्र स्टीव्ह हँके यांच्या मते, ही कदाचित परिस्थिती बिघडण्याची फक्त सुरुवात आहे. हिंदुस्तान टाईम्सशी बोलताना, हँके यांनी इशारा दिला की ट्रम्प यांची व्यापार धोरणे, भारतापा दूर जाणे आणि पाकिस्तानशी जवळीक निर्माण यामुळे आर्थिक आणि भू-राजकीय अडचणी निर्माण होऊ शकतात.

यावेळी स्टीव्ह हँके यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली. ते म्हणले, ट्रम्प असा माणूस आहे जो सकाळी मोदींशी हात मिळवू शकतो आणि रात्री त्यांच्या पाठीत खंजीर खुपसू शकतो. हँके यांनी पुढे असेही म्हटले की, भारत अमेरिकेच्या मैत्रीवर कायमस्वरूपी अवलंबून राहू शकत नाही.


# कोल्हापुरात तुंबळ दगडफेक अन् जाळपोळ करत दहशत

## पोलिसांसमोर फलकबाजीवरून वर्चस्ववादातून दोन गटाचा वाद, वाहनांची तोडफोड

**कोल्हापुर :** सिद्धार्थ नगर परिसरात असणाऱ्या चौकात कमानीजवळ काल रात्री (२२ ऑगस्ट) दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी आणि दगडफेकीची घटना घडली. सिद्धार्थ नगर कमानीजवळ असणाऱ्या चौकात सिद्धार्थ नगर आणि राजेबागस्वार येथील दोन गटांमध्ये अनेक दिवस वाद आहे. राजेबागस्वार फुटबॉल क्लबच्या ३१ व्या वर्धापनदिनानिमित्त फलक आणि साऊंड सिस्टिम लावण्यात आले होते. यावरून काल दुपारपासूनच तणाव निर्माण झाला होता. या चौकात वर्चस्व कुणाचं यावरुन देखील अनेक वर्ष तरुणांमध्ये वाद आहे. काल सायंकाळी हा वाद उफाळून आला.

ज्या बॅनर वरून हा वाद उफाळून आला ते बॅनर पोलिसांनी उतरवले

दोन्ही गटातील नागरिकांनी एकमेकांवर तुंबळ दगडफेक करण्यास सुरुवात केली. यावेळी संतपलेल्या काही तरुणांनी या परिसरातल्या चार चाकी आणि दुचाकी वाहनांची तोडफोड केली. तर काहींनी वाहने पेटवून देण्याचा प्रयत्न केला. दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात दगडफेक होत असल्याने कोल्हापूर पोलिसांनी मोठ्या प्रमाणात कुमक मागून जमाबावर नियंत्रण आणलं. दोन्ही बाजूंनी जोरदार घोषणाबाजी होत असल्याने हा वाद अधिक तीव्र होऊ नये यासाठी पोलिसांनी दोन्ही जमावला पांगवलं. तर काहींना



ताब्यात घेतलं आहे. हा नेमका वाद कशावरून झाला याबद्दल पोलिसांनी अधिकृतरित्या माहिती दिली नाही. ज्या बॅनर वरून हा वाद उफाळून आला ते बॅनर पोलिसांनी उतरवले आहेत. सध्या सिद्धार्थ नगर परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

**दगडफेकीत पोलिस जखमी**

दरम्यान, वादाला सुरुवात झाल्यानंतरल मोजका पोलिस बंदोबस्त तैनात होता. यावेळी दोन्ही बाजूकडून तुफान दगडफेक करण्यात आली. यावेळी जमावासमोर पोलिसांची हतबलता झाली. यानंतर अतिरिक कुमक मागवण्यात आली. स्वत: पोलिस अधीक्षक योगेश गुप्ताही दाखल झाले. कोल्हापूर सर्किट बेंचपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या परिसरात ही घटना घडल्याने पोलिसांनी जमावाला पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणली. या दगडफेकीत काही पोलिस सुद्धा जखमी झाले आहेत. दगडफेकीत अनेक वाहनांना सुद्धा लक्ष्य करण्यात आल्याने परिसरात काचा आणि दगडांचा खच पडला होता. वीज पुरवठा खंडित असल्याने सुद्धा कोण कोणावर दगडफेक करत आहे याबाबत समजून येत नव्हते.

पान १ वरून

### १२, २८ टक्क्यांचा जीएसटी स्लॅब रद्द!

आणि जीवन विम्यावरील प्रीमियमवर जीएसटी माफ करण्याचाबाबत चर्चा झाली. जर हा प्रस्ताव मान्य झाला तर आरोग्य आणि जीवन विमा पॉलिसीवर थेट परिणाम होईल. सध्या यावर १८ टक्के जीएसटी आकारला जातो. बहुतांश राज्यांनी या प्रस्तावाचं समर्थन केलं मात्र, हा निर्णय घेतल्यास त्यावर काटेकोर नियंत्रण ठेवलं पाहिजे, हा निर्णय घेतला गेल्यास याचा फायदा विमा कंपन्यांकडून ग्राहकांना पोहोचवला गेला पाहिजे, याचा फायदा फक्त विमा कंपन्यांनी घेऊ नये तो ग्राहकांना देखील मिळावा. ही सूट दिल्यानं सरकारला ९७०० कोटी रुपयांचं नुकसान होऊ शकतं.

### बेस्टच्या टेस्टमध्ये शिवसेना-मनसे फेल

स्टार प्रचारक म्हणून घोषणाही केली. मुंबईतील बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट (बेस्ट) कर्मचारी सहकारी पतपेढीच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून, हा निकाल केवळ बेस्ट कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे तर मुंबई व महाराष्ट्राच्या राजकारणावरही दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. या निवडणुकीत शशांक राव यांच्या पॅनेलने १४ जागांवर विजय मिळवला, तर ठाकरे बंधूंच्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (एमएनएस) केवळ ७ जागा जिंकल्या. या निकालाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, त्याचा राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीवर व भविष्यातील राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

### ओबीसीमध्ये आणखी २९ जातींचा होणार समावेश!

करण्यात आला आहे. त्यानुसार त्यांचे आरक्षणही निश्चित आहे. राज्यात सध्या ओबीसी वर्गामध्ये माळी, कुणबी, धनगर, वंजारी, तेली; तसेच विमुक्त जाती तसेच भटक्या जमाती यांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील इतर मागासवर्ग समाजातील अनेक वर्गाकडून त्यांच्या जातीचा राज्याच्या ओबीसी जातींच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव देण्यात येतात. त्यानुसार मागासवर्ग आयोगाकडून संबंधित जाती समूहांबाबतचे पुरावे; तसेच कागदपत्रांची छाननी केली जाते. कागदपत्रांची पडताळणी करून खातरजमा झाल्यानंतर संबंधित जातीचा राज्याच्या ओबीसी वर्गाच्या यादीत समावेश करण्यासाठी मागासवर्ग आयोगाकडून ओबीसींमध्ये नव्याने २९ जातींचा समावेश करण्याची सरकारला शिफारस करण्यात आली. ओबीसीच्या जातींची यादी तयार करण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. या संदर्भात राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्याशी वारंवार संपर्क साधला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळू शकला नाही.

### राज्य सरकारने मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना

दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची कार्यपद्धती ती ठरवेल. ही समिती मराठा समाजाची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी काम करणार आहे.

संदीप शिंदे समितीशी समन्वय साधून कामकाजातील अडचणी दूर कराव्या लागतील. तसंच, जात प्रमाणपत्र देण्यातील अडथळे दूर करावे लागतील. याशिवाय, मराठा समाजासाठी जाहीर केलेल्या विविध योजना, सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ योजनांचा आढावा ही समिती घेईल. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत, राज्याचे पर्यटन मंत्री शुंभराज देसाई, राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे, राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील), राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा कॅबिनेट उपसमितीचे सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

### ही बोगस जनता पार्टी आहे : उद्धव ठाकरे

चांगली बाब आहे, पण पहलगामवेळी माणुसकी कुठं जाते? गरम सिंदूर वाहत असल्याचे बोलतात आणि देशाची टीम पाकिस्तान बरोबर क्रिकेट खेळणार, जय शाह तुमचा कोण लागून गेला? आता क्रिकेट आणि रक्त एकत्र वाहणार का? अशी विचारणा उद्धव ठाकरे यांनी केली. त्यांनी पुढे सांगितले की, देशाच्या सैनिकांनी शौर्य गाजवून भाजप त्यांचे श्रेय घेत आहे. सोफिया कुरेशी या सैन्य अधिकाऱ्यांना आतंकवाद्यांची बहीण म्हणणारे भाजपचे गधडे आहेत. जगभरात आपलं शिष्टमंडळ गेलं, पण एकही देश आपल्या बाजूने उभा राहिला आहे का? आता पाकिस्तान बरोबर क्रिकेट खेळणार का? अशी विचारणा त्यांनी केली.

रशिया अफगाणिस्तानमध्ये घुसल्यावर ऑलिम्पिकवर बहिष्कार टाकला होता. त्यामुळे देश म्हणून ठाम आहात हे दाखवून द्या. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानबरोबर चीनही होता. पाकिस्तान चीनचा निषेध करायचा का? हे न शिकल्याचा परिणाम आहे. त्यांना चांगले शिक्षक मिळाले असते तर? यांना चांगला शिक्षक मिळाला नसल्याचा टोलाही त्यांनी लगावला. घुसखोरीवरूनही उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला. ते म्हणाले की, बांगलादेशच्या शेख हसीनाला आम्ही आसरा दिलेला नाही. तुम्ही भ्रष्टाचाऱ्यांना आसरा देता आहात. या सर्वांची कीव येते पण कोणाची कीव येते हे कळत नसल्याचे ते म्हणाले.

### ...तर पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याला पदावरून हटवले जाणार

२०२५ ही तीन विधेयके अमित शाह लोकसभेत मांडली. संसदेच्या संयुक्त समितीकडे ही विधेयके पाठवण्यात येणार आहेत. घटनात्मक पदावर गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्ती नकोत, या उद्देशाने ही विधेयके आणली गेली असून कायद्यात रूपांतर करण्याचा प्रस्ताव असल्याची सरकारच्या वतीने सांगण्यात आले. दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनी ६ महिने कोठडी आणि तुरुंगात राहिल्यानंतर आपल्या पदाचा राजीनामा दिला नाही आणि तामिळनाडूचे मंत्री व्ही. सेंथिल बालाजी यांनी २४१ दिवस कोठडी आणि तुरुंगात राहिल्यानंतर राजीनामा दिला नाही. केजरीवाल हे पदावर असताना अटक झालेले पहिले मुख्यमंत्री होते.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूरकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |
| **कृषि विषयक पुस्तके** | | |
| **डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील** | | |
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | | रु. ७१० |
| वाईन उद्योग | | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | | रु. २००० |
| अक्षय उर्जा | | रु. १७० |


**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Digital India
Vision India
MAKE IN INDIA
MSME

Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# अशांतता निर्माण करणाऱ्या गावगुंडांचा बंदोबस्त करा : थोरात

**संगमनेर :** काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांना मारण्याची धमकी देणाऱ्या तथाकथित संग्राम भंडारे याचा निषेध करण्यासाठी संगमनेर तालुका आपली अस्मिता जपत एकवटला असून सुमारे २५ हजार नागरिकांनी एकत्र येथेशांती मोर्चा काढला. तालुक्याचा विकास आणि शांततेचे राजकारण मोडण्यासाठी येथील लोकप्रतिनिधी हा हत्यार म्हणून काम करत असून अशातता निर्माण करणाऱ्या गावगुंडांचा बंदोबस्त करा, असे आवाहन काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यानी जनतेला केले.

स्वाभिमानी संगमनेर तालुका, सकल हिंदू समाज व विविध पुरोगामी संघटनाआणि महाविकास आघाडी आणि विविध आध्यात्मिक व वारकरी संघटना आणि राजकीय पक्षांच्यावतीने थोरात यांना मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ यशोधन कार्यालय ते नवीन नगररोड असा शांती मोर्चा काढला होता.



यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, थोर स्वातंत्र्यसैनिक भाऊसाहेब थोरात यांचा मी मुलगा आहे. संघर्ष आपल्याला नवीन नाही. विचारांसाठी आणि तत्त्वासाठी बलिदान देण्याची आपली तयारी आहे. हिंदू धर्म आणि वारकरी संप्रदायाचे आम्ही पाईक आहोत. गगनगिरी महाराजांच्या सप्ताहमध्ये वाढण्यापासूनचे काम आपण केले आहे. गावोगावी मंदिरांचे बांधकाम व सुशोभीकरण आपण केले. राष्ट्रपुरुष आणि संतांनी सांगितलेला मानवतेचा विचार घेऊन आपण पुढे जात आहोत. कधीही धर्माचा देखावा केला नाही. चुकीचा वागला त्याला शिक्षा झाली पाहिजे हा आग्रह आम्ही धरला. नवीन लोकप्रतिनिधीने निवडणुकीच्या अगोदर कधी भगवी टोपी घातली होती का ? भगवी टोपी घातली म्हणजेच हिंदू हे चुकीचे आहे. तालुक्याचा वकास काहींना पाहवत नाही आणि म्हणून या लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून हत्यार म्हणून आपला तालुका मोडण्याटे षड्यंत्र आखले जात आहे. मागील आठ महिन्यांमध्ये तालुक्यामध्ये गुंडगिरी आणि दहशत वाढली आहे.

## लावरे तो व्हिडिओ

घुलेवाडी येथील घटना ही नियोजित षडयंत्र होते. यासाठी मागील दहा दिवसांपूर्वीच प्लॅनिंग सुरू असल्याचे विविध व्हिडिओ व पुरावे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी जनतेला दाखवले असून प्रत्येक आरोपाचे खंडन करत हे षडयंत्र कसे रचले गेले, संग्राम भंडारे कसा खोटा बोलत आहे. त्याच्यावर कोणताही हल्ला झाला नाही. भंडारे आणि नवीन लोकप्रतिनिधी यांचे हे षडयंत्र दाखवताना लाव रे तो व्हिडिओ म्हणत त्यांनी सर्व पुरावे सादर केले.

> तालुक्यामध्ये तरुणांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. दहशत निर्माण केली जात आहे. हे आम्ही चालू देणार नाही. नथुराम गोडसे हा आपला आदर्श नाही. दिखाऊ हिंदुत्व आपले नाही. कारण आपण खरे हिंदू आहोत. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. आणि तो विचार घेऊन आपण पुढे जात आहोत.
>
> **- डॉ. जयश्री थोरात**

# मोनोरेलमध्ये गुदमरले प्रवासी!

### चेंबूर ते भक्तीमार्ग दरम्यान मोनोरेल बंद पडली

**मुंबई :** मुंबईतील चेंबूर ते भक्तीमार्ग या मार्गावरील मोनोरेल अचानक बंद पडली. त्यानंतर प्रवासी तब्बल अडीच तास आतमध्ये अडकून पडले होते. श्वास गुदमरलेल्या प्रवाश्यांवर अखेर काचा फोडून बाहेर पडण्याची वेळ आली. घटनास्थळावर अग्नीशामक दलाच्या मदतीने प्रवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आलं आहे.

सर्वकाही पॅक असल्यामुळे श्वास घेण्यास अडचण निर्माण झाली होती. गाडी मध्येच येऊन बंद पडली. दोन तासानंतर रेस्क्यू ऑपरेशन सुरु झालं. हळूहळू प्रवाशांना बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आले. काही तांत्रिक कारणाने चेंबूर आणि भक्तीपार्क दरम्यान एक मोनोरेल अडकून पडली आहे. एमएमआरडीए, अग्निशमन दल आणि महापालिका अशा सर्वच यंत्रणा त्याठिकाणी पोहोचल्या. सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यात आले, सर्व प्रवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात आले.

# खासदार संजय राऊतांचे पंतप्रधान मोदींना पत्र

**मुंबई :** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यानंतर भारत–विरुद्ध पाकिस्तान या सामन्याला कडाडून विरोध केला जात होता. आशिया कप २०२५ स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर झाल्यापासूनच भारताने पाकिस्तान विरुद्धच्या या सामन्यावर बहिष्कार घालावा, अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे. अशातच, पाकिस्तान विरुद्धच्या सामन्याला आता दिवसेंदिवस विरोध वाढत असताना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून आपला निषेध व्यक्त केला आहे.

भारत–पाकिस्तान आशिया कप २०२५ मध्ये खेळवण्यास क्रीडा मंत्रालयाने हिरवा कंदील दिल्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेकडून खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून निषेध व्यक्त केला आहे. आशिया कप क्रिकेट स्पर्धेत भारत–पाकिस्तान सामने खेळवण्यास हिरवा कंदील दिल्याची बातम्या प्रसिद्ध होत असताना ही बाब वेदनादायी असून गृह आणि पंतप्रधान कार्यालयाच्या परवानगीशिवाय हे शक्य नसल्याचं संजय राऊत यांनी पत्रात म्हटला आहे. पत्रात काही मुद्द्यांवर संजय राऊत यांनी बोट ठेवत या सगळ्या निर्णयासंदर्भात निषेध व्यक्त केला आहे.

तुम्ही म्हणता की पाकिस्तानविरुद्धचे ऑपरेशन सिंदूर संपलेले नाही. जर संघर्ष अजूनही सुरूच असेल तर आपण पाकिस्तानसोबत क्रिकेट कसे खेळू शकतो?

पहलगाम हल्ला एका पाकिस्तानी दहशतवादी गटाने केला होता, ज्याने २६ महिलांचे सिंदूर पुसले होते. तुम्ही त्या माता आणि बहिणींच्या भावनांचा विचार केला आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०१११२०१४१४/९८२२५२५४४४**

# वर्ल्डकप २०२७ चे ४४ सामने दक्षिण आफ्रिकेत खेळले जातील



मुंबई : मागच्या वेळेस वनडे विश्वचषक २०२३ चे यजमानपद भारताने सांभाळले होते. त्या विश्वचषकात भारतीय संघाने उत्कृष्ट खेळ करून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता. पण दुर्दैवाने टीम इंडिया किताब जिंकू शकली नव्हती. आता सर्वांच्या नजरा विश्वचषक २०२७ ( २०२५) लागल्या आहेत. आगामी वनडे विश्वचषक २०२७ ची जबाबदारी तीन देश उचलणार आहेत. या मेगा इव्हेंटच्या वेन्यूबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. आगामी वनडे विश्वचषकाचं यजमानपद दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया या तीन देशांकडे जाणार आहे. दक्षिण आफ्रिकेला तब्बल ४४ सामन्यांचं आयोजन करण्याची संधी मिळाली आहे, तर झिम्बाब्वे आणि नामिबिया या दोन देशांत मिळून १० सामने खेळवले जातील. दक्षिण आफ्रिकेतील ४४ सामने ८ वेगवेगळ्या मैदानांवर रंगणार आहेत. त्यात जोहान्सबर्ग, प्रिटोरिया, केप टाउन, डरबन, गकेबरहा, ब्लोमफोन्टेन, ईस्ट लंडन आणि पार्ल या शहरांचा समावेश आहे. दरम्यान, सध्या रोहित शर्मा आणि विराट कोहली भारतासाठी वनडे स्वरूपात खेळत आहेत. मात्र, २०२७ च्या विश्वचषकाला अजून बराच वेळ आहे. त्यामुळे तोपर्यंत हे दोन्ही खेळाडू वनडे क्रिकेटमध्ये कायम राहतील की नाही, हे पुढील काळच ठरवेल. अशीही चर्चा आहे की, विश्वचषक २०२७ च्या आधीच हे दोन्ही दिग्गज खेळाडू निवृत्तीची घोषणा करतील. ही स्पर्धा दोन गटांमध्ये खेळवली जाईल, प्रत्येक गटात ७ संघ असतील. गट टप्प्यात, प्रत्येक संघ त्यांच्या गटातील इतर सर्व संघांसोबत सामने खेळेल. प्रत्येक गटातील शीर्ष तीन संघ सुपर सिक्स फेरीत प्रवेश करतील. यानंतर, शीर्ष संघ उपांत्य फेरी खेळतील आणि शेवटी अंतिम फेरीतून नवीन विजेता निश्चित केला जाईल. दक्षिण आफ्रिकेने २००९ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी, २००७ मध्ये पहिला टी विश्वचषक आणि २००३ मध्ये एकदिवसीय विश्वचषक आयोजित केला आहे. याशिवाय, दक्षिण आफ्रिकेने दोन महिला विश्वचषक यशस्वीरित्या आयोजित केले आहेत. २००५ चा ५० षटकांचा विश्वचषक आणि २०२३ चा टी विश्वचषक, ज्यामध्ये आफ्रिकेचा संघ अंतिम फेरीत पोहोचला, पण ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021